**महाराष्ट्र राज्यात न्यायिक अधिकाऱ्यांची २८६३ पदांची तसेच त्यांचेसाठी सहाय्यभूत कर्मचाऱ्यांची ११०६४ नवीन पदांची व बाह्ययंत्रणेद्वारे ५८०३ इतके मनुष्यबळ सेवा निर्मिती करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**विधि व न्याय विभाग,**
**शासन निर्णय क्र. एचसीटी १२२२/८३८/प्र.क्र.१४३/का-३,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०६ फेब्रुवारी, २०२४.

**पहा :-**

१. मा.सर्वोच्च न्यायालयातील क्रिमिनल अपील क्र.२५४-२६२/२०१२ (इम्तीहाज अहमद विरुध्द उत्तर प्रदेश व इतर) मधील दि.०७/०१/२०१७ रोजीचे आदेश.
२. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील जनहित याचिका क्र.३६/२०२२ मधील दि.०१/१२/२०२३ रोजीचे आदेश.
३. मा.उच्च न्यायालयाचे पत्र क्र. बी(डब्लु)ए-२१०४ ऑफ २०१२/११६२/१८३७२, दि.१०/०६/२०२२.

**प्रस्तावना:-**

मा.सर्वोच्च न्यायालयाने क्रिमिनल अपील क्र.२५४-२६२/२०१२, इम्तीहाज अहमद विरुध्द उत्तर प्रदेश व इतर या प्रकरणात दि.०७/०१/२०१७ रोजीच्या आदेशान्वये न्यायिक अधिकाऱ्यांची आवश्यक संख्या निश्चित करुन नवीन पदे निर्माण करण्यासाठी मा. NCMSC (National Court Management Systems Committee) समितीच्या अंतरिम अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत, सर्व राज्यांना व मा.उच्च न्यायालयांना निर्देश दिलेले आहेत.

मा. NCMS समितीच्या अंतरिम अहवालात युनिट सिस्टिमच्या आधारे प्रलंबित व नवीन दाखल होणारी प्रकरणे निकाली काढण्यासाठी लागणाऱ्या न्यायिक अधिकाऱ्यांची संख्या ठरविण्याचे सुत्र निश्चित केले आहे. मा. NCMS समितीच्या अहवालातील सुत्र लक्षात घेऊन मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या मा. SCMS समितीने दि.११/६/२०१८ रोजी महाराष्ट्र राज्याकरिता ३२११ न्यायिक अधिकाऱ्यांची पदे निर्माण करण्यास मान्यता दिली. तसेच मा. NCMS समितीने आपल्या अंतिम अहवालात महाराष्ट्र राज्याकरिता ३२११ न्यायिक अधिकाऱ्यांची नवीन पदे निर्माण करण्याबाबत प्रस्तावित केले. त्यानुसार मा.उच्च न्यायालयाने सदर पदे निर्माण करण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर केला.

सदर प्रस्ताव विचाराधीन असतांना, मा.उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र.३६/२०२२ मधील दि.०१/१२/२०२३ व दि.२०/०१२/२०२३ रोजीच्या आदेशान्वये न्यायिक अधिकाऱ्यांची नवीन पदे निर्माण करण्याच्या सदर प्रस्तावावर तात्काळ कार्यवाही करुन निर्णय घेण्याबाबत निर्देश देण्यात आले.

मा. NCMS समितीने न्यायिक अधिकाऱ्यांची ३२११ पदांची शिफारस करतांना राज्यात न्यायिक अधिकाऱ्यांची २०१२ पदे मंजूर होती. सद्य:स्थितीत राज्यात न्यायिक अधिकाऱ्यांची २३६० एवढी मंजूर पदे आहेत. मा. SCMS समितीने शिफारस केल्यानंतर राज्यात न्यायिक अधिकाऱ्यांची ३४८ पदांची निर्मिती यापुर्वीच झालेली असल्यामुळे (३२११-३४८=२८६३) न्यायिक अधिकाऱ्यांच्या २८६३ पदांची व त्या अनुषंगाने लागणाऱ्या सहायभूत कर्मचारी संवर्गातील पदांची निर्मिती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यात जिल्हा न्यायाधीश, दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) व दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) या संवर्गातील न्यायिक अधिकाऱ्यांची नवीन २८६३ नियमित पदे तसेच त्यांचेसाठी सहाय्यभूत कर्मचारीवृदांची ११०६४ नियमित पदे निर्माण करण्यास व ५८०३ मनुष्यबळाच्या मर्यादेत बाहययंत्रणेद्वारे सेवा घेण्यास संबंधीत न्यायालय सुरु होण्याच्या दिनांकापासून या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. त्याबाबतचा तपशील खालील विवरणपत्रात दर्शविला आहे.

**१. न्यायिक अधिकाऱ्यांची संवर्गनिहाय नियमित पदांचा तपशील -**

| अ.क्र. | पदनाम | वेतनस्तर | पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा न्यायाधीश | J-५ : १४४८४० - १९४६६० | ५२७ |
| २ | दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) | J-३ : १११००० - १६३०३० | ६५२ |
| ३ | दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) | J-१ : ७७८४० - १३६५२० | १६८४ |
| | एकूण | | **२८६३** |

**२. १) जिल्हा, मुंबई नगर दिवाणी, मुंबई लघुवाद व कौटुंबिक न्यायालयातील जिल्हा न्यायाधीशांसाठी लागणाऱ्या सहाय्यभूत कर्मचारीवृंदाच्या नियमित पदांचा तपशील -**

| अ.क्र. | तपशील | पदनाम | वेतनस्तर | पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | ३२ जिल्हा न्यायालयातील | वरिष्ठ लिपिक | S-०८ : २५५००-८११०० | ३२९ |
| | | लघुलेखक (ग्रेड-१) | S-१७ : ४७६००-१५११०० | ३२९ |
| | | कनिष्ठ लिपिक | S-०६ : १९९००-६३२०० | ६५८ |
| | **एकूण** | | | **१३१६** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | मुंबई नगर दिवाणी व सत्र न्यायालयातील (दिंडोशी व शिवडीसह) | शिरस्तेदार | S-१४ : ३८६००-१२२८०० | ११८ |
| | | लघुलेखक (ग्रेड-१) | S-१७ : ४७६००-१५११०० | ११८ |
| | | दुभाषी | S-१०: २९२००-९२३०० | ११८ |
| | | लिपिक-टंकलेखक | S-०६: १९९००-६३२०० | ११८ |
| **एकूण** | | | | **४७२** |
| ३ | मुंबई लघुवाद न्यायालयातील | लघुलेखक (ग्रेड-१) | S-१७ : ४७६००-१५११०० | ३ |
| | | न्याय लिपिक | S-१३: ३५४००-११२४०० | ३ |
| | | अनुवादक व दुभाषी | S-१०: २९२००-९२३०० | ३ |
| | | लिपिक-टंकलेखक | S-६: १९९००-६३२०० | ३ |
| **एकूण** | | | | **१२** |
| ४ | कौटुंबिक न्यायालयातील | विवाह समुपदेशक | S-२०: ५६१००-१७७५०० | १५४ |
| | | लघुलेखक (ग्रेड-१) | S-१७ : ४७६००-१५११०० | ७७ |
| | | शिरस्तेदार (मुंबई) | S-१४: ३८६००-१२२८०० | २५ |
| | | शिरस्तेदार (मुंबई वगळून) | S-१३: ३५४००-११२४०० | ५२ |
| | | सहायक शिरस्तेदार | S-८: २५५००-८११०० | ७७ |
| | | अभिसाक्ष लेखनिक | S-६: १९९००-६३२०० | ७७ |
| | | लिपिक | S-६: १९९००-६३२०० | ७७ |
| | | बेलिफ | S-६: १९९००-६३२०० | ७७ |
| **एकूण** | | | | **६१६** |
| **अ.क्र. १ ते ४ ची एकूण (१३१६+४७२+१२+६१६)** | | | | **<u>२४१६</u>** |

**२.२) जिल्हा, मुंबई नगर दिवाणी, मुंबई लघुवाद व कौटुंबिक न्यायालयातील जिल्हा न्यायाधीशांसाठी मनुष्यबळाच्या मर्यादेत बाहययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा -**

| **अ.क्र.** | **तपशील** | **सेवा** | **मनुष्यबळ संख्या** |
|---|---|---|---|
| १ | ३२ जिल्हा न्यायालयातील | बहुउद्देशीय गट ड कर्मचारी (शिपाई इ.) | ६५८ |
| २ | मुंबई नगर दिवाणी व सत्र न्यायालयातील | | २३६ |
| ३ | मुंबई लघुवाद न्यायालयातील | | ६ |
| ४ | कौटुंबिक न्यायालयातील | | २३१ |
| **एकूण** | | | **११३१** |

Click Here To Join Telegram

**३.१) दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), महानगर दंडाधिकारी व मुंबई लघुवाद न्यायालय यांच्यासाठी लागणाऱ्या सहाय्यभूत कर्मचारीवृंदाच्या पदांचा तपशील -**

| अ. क्र. | तपशील | पदनाम | वेतनश्रेणी | पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | ३२ जिल्हा न्यायालयातील | वरिष्ठ लिपिक | S-८: २५५००-८११०० | ३७८ |
| | | लघुलेखक (ग्रेड-२) | S-१५: ४१८००-१३२३०० | ३७८ |
| | | कनिष्ठ लिपिक | S-६: १९९००-६३२०० | ७५६ |
| **एकूण** | | | | **१५१२** |
| २ | मुंबई महानगर दंडाधिकारी न्यायालयातील | न्याय लिपिक | S-१३: ३५४००-११२४०० | २४७ |
| | | दुभाषी | S-१०: २९२००-९२३०० | २४७ |
| | | लघुलेखक (ग्रेड-२) | S-१५: ४१८००-१३२३०० | २४७ |
| | | वरिष्ठ लिपिक | S-८: २५५००-८११०० | २४७ |
| | | लिपिक-टंकलेखक | S-६: १९९००-६३२०० | ९८८ |
| **एकूण** | | | | **१९७६** |
| ३ | मुंबई लघुवाद न्यायालयातील | लघुलेखक (ग्रेड-२) | S-१५: ४१८००-१३२३०० | २७ |
| | | न्याय लिपिक | S-१३: ३५४००-११२४०० | २७ |
| | | अनुवादक व दुभाषी | S-१०: २९२००-९२३०० | २७ |
| | | लिपिक-टंकलेखक | S-६: १९९००-६३२०० | २७ |
| **एकूण** | | | | **१०८** |
| **अ.क्र. १ ते ३ ची एकूण (१५१२+१९७६+१०८)** | | | | **<u>३५९६</u>** |

**३.२) दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), महानगर दंडाधिकारी व मुंबई लघुवाद न्यायालय यांच्यासाठी मनुष्यबळाच्या मर्यादेत बाहययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा -**

| अ.क्र. | तपशील | सेवा | मनुष्यबळ संख्या |
|---|---|---|---|
| १ | ३२ जिल्हा न्यायालयातील | बहुउद्देशीय गट ड कर्मचारी (शिपाई इ.) | ७५६ |
| २ | मुंबई महानगर न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयातील | | ४९४ |
| ३ | मुंबई लघुवाद न्यायालयातील | | ५४ |
| **एकूण** | | | **<u>१३०४</u>** |

**४.१) दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) यांच्यासाठी लागणाऱ्या सहाय्यभूत कर्मचारीवृंदाच्या पदांचा तपशील**

| अ.क्र. | तपशील | पदनात | वेतनश्रेणी | पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | ३२ जिल्हा न्यायालयातील | लघुलेखक (ग्रेड-३) | S-१४: ३८६००-१२२८०० | १६८४ |
| | | कनिष्ठ लिपिक | S-६: १९९००-६३२०० | ३३६८ |
| **एकूण** | | | | **<u>५०५२</u>** |

**४.२) दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) यांच्यासाठी मनुष्यबळाच्या मर्यादेत बाहययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा**

| अ.क्र. | तपशील | सेवा | मनुष्यबळ संख्या |
|---|---|---|---|
| १ | ३२ जिल्हा न्यायालयातील | बहुउद्देशीय गट ड कर्मचारी (शिपाई इ.) | ३३६८ |
| **एकूण** | | | **३३६८** |

२. यासाठी होणारा खर्च संबंधीत न्यायालयांच्या लेखाशीर्षाखाली टाकण्यात यावा व त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर पद निर्मितीस खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे:-

१) सदर पदांचा तीन वर्षाचा आढावा घेण्यात यावा.

२) दाखल होणारी प्रकरणे/ प्रलंबित प्रकरणे/ निकाली काढलेली प्रकरणे यांचाही ३ वर्षाचा आढावा घेण्यात यावा.

३) न्या.दाभोळकर समितीने राज्यातील जिल्हा न्यायालयाकरीता पदांचा आकृतिबंध निश्चित करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार सदर आकृतिबंध अंतिम करण्याच्या दृष्टीने संबंधित कार्यासनाने तातडीने कार्यवाही करावी.

४) सदर आकृतीबंध निश्चित करतांना प्रलंबित प्रकरणांच्या अनुषंगाने या पदांचाही विचार करावा.

५) त्याचबरोबर अनेक नव्या न्यायालयांची स्थापना होत असून त्या न्यायालयांसाठी नवीन पदे निर्माण केली जात आहेत. या नवीन पदांचाही समावेश आकृतिबंधात करण्याबाबत कार्यवाही करावी.

६) वरील मंजूर पदांवरील भरती न्यायालयांच्या पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्याने करण्याची कार्यवाही मा.उच्च न्यायालयाने करावी.

७) बाह्ययंत्रणेद्वारे सेवा घेताना, वित्त विभागाच्या दि.२७.०४.२०२२ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.अनौ.सं.५३६/आपुक दि.१९/१०/२०२३, क्र.अनौ.सं.८९६/व्यय-५, दि.७/१२/२०२३ व अनौ.सं.क्र.१७/सेवा-९ दि.४/१/२०२३ आणि मा.मंत्रीमंडळाच्या दि.१०/०१/२०२४ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेताक क्रमांक २०२४०२०६१५४८५११७१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KISHOR HIRALAL PATIL

Digitally signed by KISHOR HIRALAL PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=LAW AND JUDICIARY DEPARTMENT,
2.5.4.20=3693565814aef791c89504aa1d3dc8709504a7e2c79aac869062d39f246e81e7, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=33F5FA5CD9AF0F6FC61B56785F2BDC73FBA16D56CECF4B3AC8FAF9CD0A6932F7, cn=KISHOR HIRALAL PATIL
Date: 2024.02.06 15:48:47 +05'30'

**( किशोर हि.पाटील )**
**उप विधि सल्लागार-नि-उप सचिव**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. मा.उपमुख्यमंत्री व मंत्री (विधी व न्याय ) यांचे प्रधान सचिव.
४. मा.उपमुख्यमंत्री व मंत्री (वित्त ) यांचे प्रधान सचिव.
५. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. मा. सर्व सन्माननिय विधानसभा /विधानपरिषद, व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य.
७. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधानपरिषद) विधानभवन, मुंबई.
८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई.
९. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
१०.प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
११.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई.
१२.महालेखापाल- एक/दोन (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
१३.महालेखापाल- एक/दोन (लेखापरीक्षा) महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
१४. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१६. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
१७. प्रमुख न्यायाधीश, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई.
१८. मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई.
१९. मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई.
२०. सर्व प्रमुख न्यायाधीश, कौंटुबिक न्यायालय,
२१. सर्व जिल्हा व सत्र न्यायाधिश.
२२. सह संचालक, न्यायिक अधिकारी प्रशिक्षण संस्था, नागपूर.

२३.सह संचालक, महाराष्ट्र न्यायिक अकादमी, उत्तन.

२४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

२५. धर्मादाय आयुक्त, मुंबई.

२४. विधी व न्याय विभागातील सर्व कार्यासने.

२५. वित्त विभाग (सेवा-७/व्यय-०५).

२६. सर्व मंत्रालयीन विभाग.

२७. निवड नस्ती/कार्यासन ३.